**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ३८/२०१९**

**निशाणी १२ वरील आदेश**

(दिनांक ०५/०२/२०२१)

१. प्रस्तुत कामी मुळ अर्जदार यांच्याकडुन अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती वेळेत न मिळाल्याने सामनेवाला यांना विधीज्ञांची नियुक्ती करुन कागदपत्रे प्राप्त करुन मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये करोना महामारीमुळे लॉकडाऊन सुरु झाल्यानेही सामनेवाला यांना मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे झालेला विलंब माफ होऊन त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्याची विनंती केली. प्रस्तुत अर्जावर मुळ अर्जदार यांनी म्हणणे दाखल करुन हरकत घेतलेली आहे.

२. प्रकरण व अभिलेखाचे युक्तीवादांती अवलोकन करता तसेच सामनेवाला यांनी अर्जात नमुद केलेले कारण विचारात घेता सामनेवाला यांना म्हणणे दाखल करण्यास झालेल्या विलंबास पुरेसे कारण असल्याचे दिसुन येते. तसेच त्यांना झालेला विलंब माफ न केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट, प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास कामकाज गुणदोषावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

# <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर.

२. सामनेवाला क्र. ४ यांना म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येत आहे.

Bhushan Ramesh Thakur
Digitally signed by Bhushan Ramesh Thakur
Date: 2021.02.05 16:50:42 +0530

(भूषण र. ठाकूर)

दिनांकः– ०५/०२/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

इस्लामपूर.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. Pradip T. Patil |
| Court | : | Jt. Civil Court Sr.Dn.Islampur |
| Date of Order/Judgment | : | 05/02/2021 |
| Typed on | : | 05/02/2021 |
| Signed by P.O. on | : | 05/02/2021 |
| Uploaded on | : | 05/02/2021 |